पोलीस अधीक्षक, कार्यालय, पालघर.
जिल्हा मुख्यालय, कोळगाव, पालघर
दुरध्वनी – ०२५२५ - २५११००
E-mail: - sp. palghar@mahapolice.gmail.com

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

---

# प्रेसनोट क्र. ४४ दिनांक २२/०८/२०२२

# बोईसर पोलीस ठाणे येथे दाखल चोरीच्या गुन्ह्यांची उकल करण्यात बोईसर पोलीसांना यश

दि.१९/०८/२०२२ रोजी सकाळी ११.४५ ते १२.१५ वाजेच्या दरम्यान ओस्तवाल बिग बाजार येथे रोडलगत बोईसर ता.जि.पालघर येथे एकूण ६७,५००/- रुपये किमतीचा मुद्देमाल अज्ञात इसमाने चोरी केली असल्याची फिर्यादी नामे डॉ.श्री.हरिश्चंद्र प्रभुदयाल मल्होत्रा रा.क्लस्टर अे-०७ प्लॅट नं.००४ बि.नं. अे.०६ टाटा हाऊसिंग बोईसर ता.जि.पालघर यांनी फिर्याद दिल्याने बोईसर पोलीस ठाणे येथे गु.र.नं. I ३६४/२०२२ भा.द.वि.सं कलम ३७९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

तसेच दि.१६/०८/२०२२ रोजी रात्रौ ००.०० वा चे नंतर एन.जि.एल कंपनी बोईसर ता.जि.पालघर येथे एकूण १४,७६,०००/- रुपये किमतीचा मुद्देमाल दोन अज्ञात चोरट्यांनी चोरी केली असल्याची फिर्यादी नामे दिपक वामन चौधरी, रा. यशवंतसृष्टी वायब्रन्ट होम जि. ४०२ बोईसर जि.पालघर, मुळ रा. मु.पो. खेंडा जि.नागपूर यांनी फिर्याद दिल्याने बोईसर पोलीस ठाणे येथे गु.र.नं. I ३६५/२०२२ भा.द.वि.सं. कलम ३८० प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

पालघर जिल्ह्यातील वाढत्या चोरीचे प्रमाण लक्षात घेता श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक पालघर यांचे मार्गदर्शनाखाली श्री नित्यानंद झा, सहा.पोलीस अधीक्षक, तथा उप विभागीय पोलीस अधिकारी बोईसर विभाग यांनी बोईसर पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी श्री सुरेश कदम यांना वेगवेगळी दोन पथके तयार करण्यास सांगून सदर दोन्ही गुन्ह्याचा तपास करुन गुन्हे उघड करण्यात आले आहेत. सदर दोन्ही गुन्ह्यातील एकूण १५,४३,५००/- रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला असून एकूण तीन आरोपींना अटक करण्यात आले आहे. सदर गुन्ह्यांचा अधिक तपास हा बोईसर पोलीस ठाणेचे अधिकारी करीत आहेत.

सदरची कामगिरी श्री.बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर, श्री. प्रकाश गायकवाड, अपर पोलीस अधीक्षक पालघर यांचे मार्गदर्शनाखाली श्री नित्यानंद झा, सहा.पोलीस अधीक्षक, तथा उप विभागीय पोलीस अधिकारी बोईसर विभाग, श्री सुरेश कदम, प्रभारी अधिकारी बोईसर पोलीस ठाणे, पोउपनि/शरद सुरळकर तसेच बोईसर पोलीस ठाणे येथील पोलीस अंमलदार यांनी तपास करुन उपरोक्त दोन्ही गुन्हे उघडकीस आणले आहेत.